स्थापना : दि. ५ मे २००८
नों.क्र.महा./२४९२९/को./११/०७/०८


शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
शिविम
मराठी
॥ सामर्थ्य मायमराठीचं ॥
॥ विकसन MY बोलीचं ॥

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal )
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका


वर्ष–आठवे : अंक विसावा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९

## जन्मस्मृती विशेषांक


२ ऑक्टोबर, १८६९


८ नोव्हेंबर, १९१९


१ ऑक्टोबर, १९१९


१ ऑगस्ट, १९२०


७ जानेवारी, १९२०

Scanned by CamScanner

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष-आठवे : अंक विसावा**

ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१९

## जन्मस्मृती विशेषांक

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. १००/-

Scanned by CamScanner

# अंतरंग

**संपादकीय** / डॉ. नीला जोशी ........................................ ३
**गांधीविचाराला मराठी साहित्याने दिलेला प्रतिसाद** / डॉ.सुभाष वाघमारे ........ ५
**सानेगुरुजींच्या साहित्यावरील महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव** / डॉ. शीतल गोर्डे-पाटील ........................................ १४
**गदिमांचे गीतरामायण : एक श्राव्यात्मक आविष्कार** / डॉ. धनंजय होनमाने ........ २२
**गदिमा आणि त्यांची राष्ट्रीय कविता** / प्रा. संभाजी कदम ........................ २९
**पु. ल. देशपांडे यांची नाटके** / डॉ. आनंद बल्लाळ ........................ ३७
**पु. लं. ची 'ती फुलराणी'** / डॉ. मानसी जगदाळे ........................ ४५
**'तुझे आहे तुजपाशी'** / डॉ. सुभाष जाधव ........................ ५०
**व्यक्तिचित्रणकार पु. ल.**/ प्रा. डॉ. संजय पाटील ........................ ५७
**सरोजिनी बाबर यांची 'समाज शिक्षणमाला'**/ डॉ. अरूण शिंदे ........................ ६३
**सरोजिनी बाबर यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व**/डॉ. प्रकाश दुकळे ........................ ७२
**सरोजिनी बाबर यांच्या लोकसाहित्यातील स्त्रीगीते**/ज्ञानेश्वर कांबळे........................ ७७
**लोकसाहित्याच्या शोधवाटा आणि सरोजिनी बाबर**/प्रा. डी. जे. दमामे ........................ ८८
**प्रवासवर्णनातील पु. लं. चे व्यक्तिमत्त्व** / प्रा. वैशाली गुंजेकर ........................ ९२
**पु. ल. देशपांडे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व** / डॉ. तातोबा बदामे ........................ ९९
**अण्णा भाऊंच्या शाहिरीतील प्रबोधन विचार** / डॉ. दत्ता पाटील ........................ १०५
**'अण्णा भाऊराव साठे यांच्या कादंबरीतील उपेक्षितांचे ग्रामीण वास्तवदर्शी चित्रण'**/डॉ. सविता व्हटकर........................ ११३
**समाजप्रबोधनाचा विवेकी आविष्कार: अण्णा भाऊ**/प्रा. अमोल चांदेकर ........................ १२२
**अण्णा भाऊ साठे यांची शाहिरी** / प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड ........................ १२७
**अण्णा भाऊंच्या वाङ्मयातील समाजप्रबोधन**/डॉ. शैलजा शिंदे ........................ १४३
**अण्णा भाऊंच्या गण आणि लावणीच्या आशयातील क्रांतिकारी बदलांचा शोध** / डॉ.आनंद वारके ........................ १४९
**अण्णा भाऊ साठेंच्या कथेतील विद्रोह** / प्रा. अशोक मोरमारे........................ १५५
**अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व** / प्रा. सुनिता रोकडे ........................ १६२

**सूचना :** पत्रिकेत प्रसिद्ध होणाऱ्या लेखकांच्या मतांशी संपादक मंडळ वा शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ सहमत असतीलच, असे नाही.


ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner

# 'तुझे आहे तुजपाशी'

**डॉ. सुभाष गणपती जाधव**

मराठी साहित्यलेखन करणारे अनेक दिग्गज लेखक आहेत. मात्र अष्टपैलू व्यक्ति लाभलेले असे मोजकेच लेखक आहेत. त्यापैकी एक म्हणजे पु.ल.देशपांडे हो पु.ल.देशपांडे यांचा जन्म मुंबईमध्ये ८ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला. आज आ त्यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. पुलंच व्यक्तिमत्त्व म्हणजे महारा खळखळून हसवणारे व्यक्तिमत्त्व आहे. पुलंनी विविध प्रकारचे लेखन केले आ माणसाच्या जीवनातील सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारे लेखन केले. पुलंनी जवळज ४०च्या जवळपास पुस्तकांचे लेखन केले. त्यांचे 'बटाट्याची चाळ', 'असा मी अ मी', 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकांच्या २० हून अधिक आवृत्त्या निघाल्या आहे पु.ल.देशपांडे यांची विनोदी लेखक म्हणून महाराष्ट्राला मिळालेली देणगी आहे. पु दूरदर्शनवर पहिले मुलाखतकार म्हणून काम केले. ते लेखक, अभिनेता, कथा-पटक लेखक, संगीतकार, प्रभावी वक्ते होते. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहि प्रवास वर्णन लिहिले. व्यक्तिचित्रणांचे संपादन केले. चरित्रलेखन केले. एकपात्री प्र केले. एकांकिका संपादन केल्या. लोकनाट्ये लिहिली. विनोदी कथा लिहि व्यक्तिचित्रणे लिहिली. अनेक चित्रपटांत अभिनय करून गीतरचना केली. हे सर्व क असतानाच काही काळ शिक्षकाची नोकरी केली. इतर लेखनाबरोबर मराठी नाट लिहून नाट्य वाङ्मय अधिक समृद्ध केले.

पु.ल.देशपांडे यांनी लिहिलेल्या नाटकांपैकी एक वेगळे आणि स्वतंत्रपणे मराठ लिहिलेले नाटक म्हणजे 'तुझे आहे तुजपाशी' हे होय. हे नाटक खूपच गाजले. नाटकातून दोन पिढ्यांचे चित्रण येते. गांधी विचार आणि जीवन जगण्याची वास्त या कथानकातून मांडली आहे. हे नाटक इ.स. जानेवारी १९५७ मध्ये प्रकाशित झा या नाटकाचा पहिला प्रयोग २६ जानेवारी १९५७ रोजी रात्री ९ वाजता केळेवाडी मुं -४ येथील मराठी साहित्य संघ मंदिरात सादर करण्यात आला. हे नाटक तीन अं असून यातून दोन पिढ्यांचे संस्कार दिसून येतात. हे नाटक इंदूरातील देवास्करां वाड्यात घडते. या नाटकात येणारी पात्रे (व्यक्तिरेखा) ही प्रामुख्याने काकाजी, श्या आचार्य पोफळे गुरुजी, गीता या प्रथमस्थानी येणाऱ्या आहेत. द्वितीय स्थानी सती उषाताई ही पात्रे येतात. तृतीय स्थानी माळी, वासूअण्णा, ड्रायव्हर व विशाल मंडळ

ISSN No. 2319-6



महिला येतात. एकूणच या नाटकातून पुलंनी आयुष्यात सर्व गोष्टी या माणसाच्या जवळच आहेत. हे सांगण्याचा वेगळा प्रयत्न नाटकाच्या माध्यमातून केला आहे.

नाटकाच्या पहिल्या अंकात काकाजी हे फॉरेस्ट खात्यातून अधिकारी पदावरून रिटायर झाले आहेत. काकाजी आणि श्याम हे बुद्धिबळ खेळतात. खेळातील सवंगड्यानुसार त्यांचे विषय रंगत जातात. हा खेळ रंगत असताना देवास्करांच्या वाड्यातील इतर नोकर वासूअण्णा, जगन्नाथ व भिकू हेही येतात. काकाजीपासून प्रत्येकजण रेडिओवरील रटाळ गाणं बंद करण्यासाठी एकमेकांना बोलवतात व पुन्हा बुद्धिबळामध्ये रंगून जातात. खेळता खेळता श्याम तारीख विचारतो आणि त्याची धावपळ सुरू होते. कारण वासूअण्णा आणि श्याम यांना आज पोफळे गुरुजी यांना आणण्यासाठी उषाताईने स्टेशनवर जाण्यास सांगितले होते. श्याम स्टेशनवर जात असताना फोन वाजतो. प्रत्येकवेळी आचार्य आले का, हेच फोनवरून विचारले जाते. असे अनेक फोन येतात. त्यामुळे श्याम, काकाजी वैतागतात व शेवटी रिसीव्हर बाजूला काढून श्याम स्टेशनवर जातो.

श्याम जाताच सतीश येतो. तो पेशाने डॉक्टर आहे. मात्र मनाने कवी आहे. हा त्याचा स्वभाव काकाजींना आवडतो. कारण काकाजी स्वच्छंदी जीवन जगत आयुष्य व्यथित करत असतात. हसत-खेळत जगायचं असेल तर सर्व गोष्टींचा उपभोग घेता आला पाहिजे म्हणून ते गुडगुडी ओढताना दिसतात. दरम्यान उषाताई येतात आणि संतापून त्या काकाजी व सतीशवर बुद्धिबळ खेळण्यावरून रागवतात. त्यांना आचार्यांची भेट झालेली नसते म्हणून त्या अस्वस्थ आहेत. काकाजी गुडगुडी पेटवण्यास आतमध्ये जातात. सतीश आणि उषाताई जुन्या आठवणीत गडून जातात. पूर्वी त्यांचे एकमेकांवर प्रेम असते. मात्र आता उषाताई राष्ट्रसेवेच्या कामाला स्वत:ला बांधून घेतात. बोलत असताना दोघेही स्वप्नातून शंकराचार्य - ब्रह्मसत्य - गीतरहस्य - शांकर भाष्य - पतंजलीयोग यावर येतो आणि उषा त्या गोष्टींचा उपयोग काय असे म्हणताच सतीश म्हणतो-

''सतीश : अगं, प्रत्येक गोष्ट काय उपयोगासाठी ठेवायची असते? घरदार सोडून गेलेल्या गौतमबुद्धाचा पुतळा नाही आपण दिवाणखान्यात मांडून ठेवीत? आमच्या एका डॉक्टर मित्राच्या दवाखान्यात भिंतीवर नेपोलियन, महात्मा गांधी, साईबाबा आणि ग्रेट गार्बो एका ओळीने टांगले आहेत. ज्यांचे जे दैवत असेल ते त्याने निवडून घ्यावे. मुंबईत ते फेरीवाले नाही ओरडत - दो दो आना, दो दो आना, कोई भी चीज उठाव. जर्मन मालिकका दिवाला - बस्सं! तसंच स्वत:वरच्या विश्वासाचं दिवाळं

ISSN No. 2319-6025

# 'तुझे आहे तुजपाशी'

डॉ. सुभाष गणपती जाधव

मराठी साहित्यलेखन करणारे अनेक दिग्गज लेखक आहेत. मात्र अष्टपैलू व्यक्तिमत्त्व लाभलेले असे मोजकेच लेखक आहेत. त्यापैकी एक म्हणजे पु.ल.देशपांडे होय. पु.ल.देशपांडे यांचा जन्म मुंबईमध्ये ८ नोव्हेंबर १९१९ रोजी झाला. आज आपण त्यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहोत. पुलंचे व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराष्ट्राला खळखळून हसवणारे व्यक्तिमत्त्व आहे. पुलंनी विविध प्रकारचे लेखन केले आहे. माणसाच्या जीवनातील सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारे लेखन केले. पुलंनी जवळजवळ ४०च्या जवळपास पुस्तकांचे लेखन केले. त्यांचे 'बटाट्याची चाळ', 'असा मी असा मी', 'व्यक्ती आणि वल्ली' या पुस्तकांच्या २० हून अधिक आवृत्त्या निघाल्या आहेत. पु.ल.देशपांडे यांची विनोदी लेखक म्हणून महाराष्ट्राला मिळालेली देणगी आहे. पुलंनी दूरदर्शनवर पहिले मुलाखतकार म्हणून काम केले. ते लेखक, अभिनेता, कथा-पटकथा लेखक, संगीतकार, प्रभावी वक्ते होते. त्यांनी अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या. प्रवास वर्णन लिहिले. व्यक्तिचित्रणांचे संपादन केले. चरित्रलेखन केले. एकपात्री प्रयोग केले. एकांकिका संपादन केल्या. लोकनाट्ये लिहिली. विनोदी कथा लिहिल्या. व्यक्तिचित्रणे लिहिली. अनेक चित्रपटांत अभिनय करून गीतरचना केली. हे सर्व करत असतानाच काही काळ शिक्षकाची नोकरी केली. इतर लेखनाबरोबर मराठी नाटक लिहून नाट्य वाङ्मय अधिक समृद्ध केले.

पु.ल.देशपांडे यांनी लिहिलेल्या नाटकांपैकी एक वेगळे आणि स्वतंत्रपणे मराठीत लिहिलेले नाटक म्हणजे 'तुझे आहे तुजपाशी' हे होय. हे नाटक खूपच गाजले. या नाटकातून दोन पिढ्यांचे चित्रण येते. गांधी विचार आणि जीवन जगण्याची वास्तवता या कथानकातून मांडली आहे. हे नाटक इ.स. जानेवारी १९५७ मध्ये प्रकाशित झाले. या नाटकाचा पहिला प्रयोग २६ जानेवारी १९५७ रोजी रात्री ९ वाजता केळेवाडी मुंबई -४ येथील मराठी साहित्य संघ मंदिरात सादर करण्यात आला. हे नाटक तीन अंकी असून यातून दोन पिढ्यांचे संस्कार दिसून येतात. हे नाटक इंदूरातील देवास्करांच्या वाड्यात घडते. या नाटकात येणारी पात्रे (व्यक्तिरेखा) ही प्रामुख्याने काकाजी, श्याम, आचार्य पोफळे गुरुजी, गीता या प्रथमस्थानी येणाऱ्या आहेत. द्वितीय स्थानी सतीश, उषाताई ही पात्रे येतात. तृतीय स्थानी माळी, वासूअण्णा, ड्रायव्हर व विशाल मंडळाच्या


ISSN No. 2319-6025

महिला येतात. एकूणच या नाटकातून पुलंनी आयुष्यात सर्व गोष्टी या माणसाच्या जवळच आहेत, हे सांगण्याचा वेगळा प्रयत्न नाटकाच्या माध्यमातून केला आहे.

नाटकाच्या पहिल्या अंकात काकाजी हे फॉरेस्ट खात्यातून अधिकारी पदावरून रिटायर झाले आहेत. काकाजी आणि श्याम हे बुद्धिबळ खेळतात. खेळातील सर्वगड्यानुसार त्यांचे विषय रंगत जातात. हा खेळ रंगत असताना देवास्करांच्या वाड्यातील इतर नोकर वासूअण्णा, जगन्नाथ व भिकू हेही येतात. काकाजीपासून प्रत्येकजण रेडिओवरील रटाळ गाणं बंद करण्यासाठी एकमेकांना बोलवतात व पुन्हा बुद्धिबळामध्ये रंगून जातात. खेळता खेळता श्याम तारीख विचारतो आणि त्याची धावपळ सुरू होते. कारण वासूअण्णा आणि श्याम यांना आज पोफळे गुरुजी यांना आणण्यासाठी उषाताईने स्टेशनवर जाण्यास सांगितले होते. श्याम स्टेशनवर जात असताना फोन वाजतो. प्रत्येकवेळी आचार्य आले का, हेच फोनवरून विचारले जाते. असे अनेक फोन येतात. त्यामुळे श्याम, काकाजी वैतागतात व शेवटी रिसीव्हर बाजूला काढून श्याम स्टेशनवर जातो.

श्याम जाताच सतीश येतो. तो पेशाने डॉक्टर आहे. मात्र मनाने कवी आहे. हा त्याचा स्वभाव काकाजींना आवडतो. कारण काकाजी स्वच्छंदी जीवन जगत आयुष्य व्यथित करत असतात. हसत-खेळत जगायचं असेल तर सर्व गोष्टींचा उपभोग घेता आला पाहिजे म्हणून ते गुडगुडी ओढताना दिसतात. दरम्यान उषाताई येतात आणि संतापून त्या काकाजी व सतीशवर बुद्धिबळ खेळण्यावरून रागवतात. त्यांना आचार्यांची भेट झालेली नसते म्हणून त्या अस्वस्थ आहेत. काकाजी गुडगुडी पेटवण्यास आतमध्ये जातात. सतीश आणि उषाताई जुन्या आठवणीत गढून जातात. पूर्वी त्यांचे एकमेकांवर प्रेम असते. मात्र आता उषाताई राष्ट्रसेवेच्या कामाला स्वत:ला बांधून घेतात. बोलत असताना दोघेही स्वप्नातून शंकराचार्य - ब्रह्मसत्य - गीतरहस्य - शांकर भाष्य - पतंजलीयोग यावर येतो आणि उषा त्या गोष्टींचा उपयोग काय असे म्हणताच सतीश म्हणतो-

''सतीश : अगं, प्रत्येक गोष्ट काय उपयोगासाठी ठेवायची असते? घरदार सोडून गेलेल्या गौतमबुद्धाचा पुतळा नाही आपण दिवाणखान्यात मांडून ठेवीत? आमच्या एका डॉक्टर मित्राच्या दवाखान्यात भिंतीवर नेपोलियन, महात्मा गांधी, साईबाबा आणि ग्रेट गार्बो एका ओळीने टांगले आहेत. ज्यांचे जे दैवत असेल ते त्याने निवडून घ्यावे. मुंबईत ते फेरीवाले नाही ओरडत - दो दो आना, दो दो आना, कोई भी चीज उठाव. जर्मन मालिकका दिवाला - बस्सं! तसंच स्वत:वरच्या विश्वासाचं दिवाळं

ISSN No. 2319-6025


Scanned by CamScanner

निघालं की, कुठल्या तरी बाबाची आंगठी घाल बोटात, कुठल्या तरी गुरुचा मंत्र जप, कुठल्या तरी आचार्याला उठव, असं करावं लागतं. उदाहरणार्थ, आता हे आमचे मामा!''[१]

या विधानानंतर उषाला आचार्य पोफळे गुरुजी हे सतीशचे मामा असल्याचे समजते. ते यावेळी सतीशच्या घरीच होते. बोलत बोलत दोघेही मनातील प्रेमाच्या धाग्यात पुन्हा गुंतून जातात. सतीश काही ना काही निमित्ताने तिला जुन्या आठवणीत घेऊन जातो. दरम्यान काकाजी हुका पेटवून घेऊन बाहेर येतात. ते येताच दोघेही भानावर येतात. सतीश आणि काकाजी पुन्हा आपल्या आयुष्यातील घटनांवर चर्चा करतात. उषाचे आई-वडील दोघेही टायफॉईडने मरण पावल्याने श्याम व उषाचा सांभाळ काकाजींनी केलेला असतो.

आचार्य वाड्यात येतात आणि सतीशवर रागावतात. 'पाच मिनिटात येतो', असे सांगून तो परत न आल्याने त्यांना त्याचा राग येतो. नेहमी वेळेचे बंधन पाळणारे आणि देशसेवा करण्यासाठी आयुष्य खर्ची करणारे असे हे आचार्य आहेत. हे त्यांच्या कृतीतून दिसते. आचार्य गांधी विचाराने वागत असतात. ते गीतेला वेळ विचारतात तेव्हा गीता त्यांना 'अकरा वाजले' म्हणते; तेव्हा ते पुन्हा प्रश्न करतात, 'बरोबर अकरा?' यावेळी २ मिनिटं कमी असतात. आचार्य यावेळी म्हणतात, ''मग दहा अठ्ठावन्न म्हणून का नाही सांगितलंस?'' असं म्हणून नेपोलियनचं उदाहरण देतात. यातून आचार्यांचा स्वभाव कडक असल्याचे दिसते. प्रत्येक गोष्ट वेळेत करण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असतात. आचार्य उषाच्या नियोजनावर रागावतात. त्यांना स्टेशनवरून वेळेत आणण्यासाठी श्याम गेला नाही. याचा त्यांना प्रचंड राग आलेला असतो. दरम्यान श्याम येतो आणि गीताची ओळख करून घेऊन बोलू लागतो. गीता ही आचार्यांची मानलेली मुलगी असते.

श्याम सुरुवातीला आचार्यांना पाहिजे ते बोलणारा, स्वच्छंदी वागणारा असा दुसऱ्या अंकात आचार्यांच्या विचारांनी वागताना दिसतो. त्याच्यावर अहिंसेचा व गांधी विचारांचा पगडा पडलेला दिसतो. त्याच्याबरोबर वासूअण्णा व जगन्नाथ हेही अहिंसेच्या विचाराने वागताना दिसतात. गीतेतील अध्याय पाठ करू लागतात. याचे उषाताईला नवल वाटते. श्याम व गीता हे एकमेकांच्या जवळ येऊ लागतात. उषाला श्यामने खादीचे कपडे घातले याचे नवल वाटते. यावेळी उषा आणि गीता बोलताना आत्मज्ञानाच्या शोधाचा विषय निघतो तेव्हा गीता उषाला म्हणते-

''गीता : मी कसल्याच शोधासाठी निघाले नाही उषाताई. अहो, अनाथ मुलगी मी. जिथं अन्न मिळालं, वस्त्र मिळालं, तिथं मी राहिले. आचार्यांच्या आश्रमात



ISSN No. 2319-6025

आजपर्यंतचं आयुष्य गेलं माझं. आचार्यांनी प्रार्थना म्हण म्हटलं की प्रार्थना म्हणायची. सूत काढ म्हटलं की सूत काढायचं. रस्ते झाड म्हटलं की, रस्ते झाडायचे. हे का करायचं? असं का? यानं काय होणार आहे? याचा कधीच विचार केला नाही मी. असं का? आत्ताच यांनी मला ह्या प्रश्नाचं उत्तर दिलं.''[२]

येथे गीता अनाथ असल्याचे सांगते. आचार्यांनी तिला मोठं केलं होतं. श्याम गीताला बुद्धिबळ शिकवत असतो, यातूनच ती असे विधान करते. तिला हळूहळू स्वतःची जाणीव होऊ लागते. गीता ही क्रांतिकारकाची मुलगी असते. तिच्या वडिलांचा मृत्यू हा तुरुंगात होतो. तेव्हापासून प्रत्येकजण गीताला हेच ऐकवतो की, 'तू क्रांतिकारकाची मुलगी आहेस. तू आयुष्यभर देशसेवा केली पाहिजेस.' त्यामुळे आचार्यांच्या सांगण्याप्रमाणे ती जीवन जगताना दिसते. उषा ही श्याम व गीतेला सिनेमा बघण्यास जायचं म्हणते त्यामुळे ती रंगीत साडी परिधान करून, केसात फूल माळून तयार होते.

श्याम हा सिनेमा पाहण्यास तयार झालेला; मात्र या क्षणी विशाल मंडळाच्या महिला तेथे येतात आणि श्यामच्या पेहरावावरून त्यालाच आचार्य समजतात. मिसेस पळसुले, मिसेस नाडकर्णी, मिसेस काळे या त्या महिला असतात. यांना स्वतःच्या श्रीमंतीचे गोडवे गायला आवडते. आपण एकापेक्षा एक कसे वरचढ आहोत, हे प्रत्येक वेळेला एकमेकींना सांगत असतात. यावेळी आचार्य येतात आणि श्याम, उषा व गीताला त्यांचा पेहराव पाहून रागवतात. विशाल मंडळाच्या महिला या आचार्यांना प्रवचनाचे निमंत्रण देतात. पण यांच्यात कोणत्या दिवशी बोलवायचं यावर एकमत होत नाही. त्यांचा गोंधळ पाहून आचार्य रागावतात व त्यांना तेथून जाण्यास सांगतात. गीताचा पेहराव पाहून त्यांना खूपच राग येतो. यावेळी गीता माफी मागते पण श्याम हा आपल्यामुळेच गीताने वेणीमध्ये फूल माळून, साडी नेसल्याचे सांगतो. हे सांगताना तो भगवत् गीतेचाच आपण नेहमी विचार करतो आहोत हेही सांगतो. आचार्यांना त्याच्या बोलण्याचा अर्थबोध होतो. आचार्य व श्याम तेथून जातात आणि सतीश तेथे येतो. सतीश व उषा भावनिक विषयावर बोलू लागतात. उषाच्या मनातील देशसेवेचा विचार कमी झाला असून, ती प्रेमाचा अधिक विचार करू लागते. एकूणच येथे श्याम, गीता, सतीश व उषा यांच्या जगण्यात, वागण्यात परिवर्तन झालेले दिसते.

नाटकाच्या तिसऱ्या अंकात दिवाणखान्यात श्याम, वासूअण्णा, काकाजी एकमेकांशी बोलत असतात. मन आणि मोह याविषयी चर्चा असते. काकाजी श्यामला गीतेचे श्लोक पाठ करताना डोक्यात कोणाचा विचार चालू असतो, हे माहिती असल्याचे सांगताच श्याम स्वतःला मन जिंकायचं असल्याचं बोलतो तेव्हा काकाजी श्यामला

ISSN No. 2319-6025



Scanned by CamScanner

म्हणतात -

''काकाजी :- बेशक - बेशक मन जिंकायला जा. पण ते मन कुठं बसलंय, त्याचा तर आधी शोध घेशील ? अरे, मन जिंकणाऱ्या तुझ्या संतमहंतांच्या गोष्टी राहू दे. ह्या इथं, ह्या वाड्यात आग्रेवाली रोशन गायला आली होती एकदा. तरुण होतो आम्ही तेव्हा तुझ्या आजोबांचा गाण्याबजावण्याचा शौक म्हणजे खुला बिलकुल ! बाई असो, बुवा असो, नाचगाणं इथं ! चोराचोरीला मामला नाही. आजोबांचं तर सोडाच. पण तुझ्या आजीनं इथं आत बसल्याबसल्या इतकं गाणं ऐकलं होतं की, मलकाजान एक अंतरा विसरली ठुमरीचा, तर आतून आजीनं पुढले शब्द सांगितले! गाणं ऐकणं, सौंदर्याचा आस्वाद घेणं, यात पाप वाटायचं कारण काय? पाप बळजबरीत आहे. सक्तीत आहे. परिणामांची जिम्मेदारी नाकारण्यात आहे, खुशीत पाप नाही.''[३]

वरील काकाजीच्या विधानातून जीवन कसं जगलं पाहिजे, याचे उत्तम स्पष्टीकरण दिले आहे. श्यामवर याचा परिणाम होतो आणि श्याम आचार्यांसोबत जाण्याचा निर्णय रद्द करतो. एका पेपरमध्ये श्याम, उषा व गीता यांच्याविषयी सिनेमा पाहिल्याचा मजकूर छापून आला तसं आपली बदनामी झाल्याचे वाटते. काय करावे त्यांना सुचत नाही. गीता तर जीव देण्याची भाषा करते. यावेळी काकाजी महत्त्वाची भूमिका घेतात त्या तिघांनाही समजवतात, 'जे आपण केले आहे ते मान्य करून जीवन जगलो तर आयुष्यात आनंद मिळतो. जे सत्य आहे ते स्वीकारा' असे सांगतात. आचार्य मात्र या बातमीने गीतावर रागावतात, ''आश्रमात असलेच संस्कार शिकलीस का?'' म्हणून प्रश्न करतात. यावेळी गीता गोंधळून जाते व त्यांची क्षमा मागते. यावेळी उषा मध्ये पडते. गीताची बाजू योग्य असल्याचे मत मांडते. एक स्त्री स्वतंत्रपणे जगू शकते. याविषयी बोलते. गीता सर्व ऐकून आचार्यांसोबत जाण्यास निघते. मात्र आचार्य तिला तेथेच थांबण्यास सांगतात. कारण उषा जे बोलते त्याचा परिणाम त्यांच्या मनावर होतो आणि गीतालाही आपल्या बंधनातून मोकळं केलं पाहिजे हे त्यांना पटते. या प्रसंगी आचार्य काकाजींना म्हणतात -

आचार्य :- काकाजी, काय मौज आहे पाहा! आयुष्यभर शांतीचे पाठ ओरडत आलो मी. तुम्ही मला शांत व्हायला सांगता. तुम्हाला अधिकार आहे काकाजी! तुम्ही कसलीही साधना केली नाही, पण तुम्ही शांत आहा! आयुष्यभर काय वाटेल ते खाल्लं तुम्ही. पण तमोगुणाचा स्पर्श नाही झाला तुम्हाला. आम्ही काय साधलं? जिथं जाऊ तिथं आमचा उपद्रव परवा उज्जैनला ज्या गृहस्थाच्या घरी उतरलो होतो, तिथं मी नवरा-बायकोचं भांडण ऐकलं. स्वयंपाकघरात बायको नवऱ्याला सांगत होती. त्याला हात सडीचा तांदूळ हवा असला तर बरोबर बांधून आणीत जा म्हणावं. असल्या किती माऊल्यांचे शिव्याशाप खात अन्न खाल्लं आम्ही! का? स्वतःच्या अहंकाराला आहुती टाकून जिवंत ठेवायला. गीता, राहा बाळ, तू खुशाल इथं राहा. जिथं तू फुलशील, बहरशील तिथं राहा - मी चाललो.[४]


ISSN No. 2319-6025

असे बोलून आचार्य जाण्यास निघतात. गीता त्यांना जाऊ देत नाही तेव्हा काकाजी गीताला पुन्हा समजवतात. ते म्हणतात -

काकाजी : थांब बेटा - थांब! (तिला जवळ घेतात) जाऊ दे त्यांना. आता सूर सापडला त्यांना. न पेलणाऱ्या पट्टीत गाऊ नये बेटा, नाहीतर सगळं आयुष्य बेसूर होऊन जातं. गीता जाऊ दे आचार्यांना त्यांच्या जीवनाचे तंबोरे मस्त जुळून राहिले आहेत आता. आता खरी मजा येईल त्यांच्या आयुष्यात जाऊ दे - जाऊ दे त्यांना.''[५]

काकाजींचं बोलणं गीता ऐकते व आचार्य निघून जातात आणि नाटक संपते.

नाटकाचा एकंदरीत विचार करता यात दोन (२) पिढ्यातील जगण्याचा संघर्ष दिसतो. काकाजी व आचार्य यांची एक पिढी. मात्र काकाजी हे स्वच्छंदपणे जीवन जगण्यात गुंग असलेले दिसतात. यातून त्यांना शेवटपर्यंत आनंद मिळतो. पण आचार्य हे गांधी विचाराने देशसेवेच्या माध्यमातून स्वतःला काही बंधने घालून घेतात. यातून त्यांना आनंदाऐवजी दुःखच मिळते. या दोघांची जगण्याची वेगळी शैली दिसते. दुसऱ्या पिढीमध्ये श्याम, गीता, सतीश व उषाताई हे सर्वजण येतात. गीता व उषा या देशप्रेमाने भारावलेल्या असतात. पण काकाजींच्या सांगण्याने त्यांच्यात परिवर्तन होते आणि त्या श्याम व सतीशवर प्रेम करताना दिसतात. काकाजींच्या जगण्यातील विचार सर्वांनाच योग्य वाटतो. यातून नवीन जगण्याची वेगळी शैली विकसित होते. शेवटी काकाजींच्या विधानातून हेच स्पष्ट होते की, नाटकातील मांडणीतून अभिव्यक्त झालेले कथानक हे नाटकाच्या शीर्षकाच्या बिंदूपर्यंत येऊन थांबते.

या नाटकाच्या यशस्वीतेविषयी पुष्पा भावे यांनी जे मत मांडले आहे त्याचा विचार महत्त्वाचा ठरतो. त्या म्हणतात-

'तुझे आहे तुजपाशी' या नाटकातील विविध विलोभनीय व्यक्तिरेखा, खऱ्या अर्थाने नाट्याविष्काराचे कार्य करणारे नेपथ्य, सजावट, प्रेमसंवाद, विडंबन, प्रहसनात्मक प्रसंग, गतकालाची गहिरी स्मृती या प्रत्येकानुसार बदलणारा संवादाचा पोत आणि मराठी वाचक - प्रेक्षकाला प्रिय करणारे दोन पात्रांमधील संघर्ष यामुळे ते नाटक समृद्ध झाले आहे.''[६]

एकूणच नाटक यशस्वी होण्यासाठी ते समृद्ध असावे लागते आणि समृद्ध होण्यासाठी त्या पद्धतीची मांडणी झाली पाहिजे. ती या नाटकात दिसते.

प्रत्येकाने स्वतःचे निर्णय स्वतः घेतले पाहिजेत. स्वतःचे जीवन कसे जगावे हे

ISSN No. 2319-6025


Scanned by CamScanner

स्वतःच ठरविले पाहिजे. निर्णय घेण्यासाठी सर्व काही स्वातंत्र्य आपल्याजवळच आहे. म्हणून नाटकाला पुलंनी 'तुझे आहे तुजपाशी' हे योग्य शीर्षक देऊन माणसांच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांचा उलघडा घटनाद्वारे केला आहे. तोही काही प्रमाणात धीरगंभीर तर काही वेळा विनोदी पद्धतीने खोचकपणे मांडण्यात पु.ल. यशस्वी झाले आहेत. भाषाशैलीच्या बाबतीत पुलंनी त्या त्या पात्रानुरूप ग्रामीण, शहरी, मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू अशा भाषेचा वापर खुबीने करून अधिक परिणामकारकता साधलेली आहे. एकूणच हे पुलंच नाटक मराठीत त्यांनी स्वतंत्र लिहिलेले असून ते रंगभूमीवर यशस्वी झालेले आहे. म्हणूनच या नाटकाचे इतर भाषेत भाषांतरे झाली आहेत. हिंदी भाषेत हे नाटक 'कस्तुरीमृग', इंग्रजी भाषेत 'इट्स ऑल युवर्स नबाब' या नावाने तर गुजराती भाषेत 'मीनपियासी' या नावाने प्रकाशित झाले आहे. मराठीत या नाटकाच्या जवळपास १५ आवृत्त्या निघाल्या आहेत. यावरून हेही सिद्ध होते की, पु.ल.देशपांडे यांनी हे स्वतंत्र नाटक लिहून स्वतःचे असे एक वेगळे स्थान मराठी वाङ्मयामध्ये प्राप्त केले आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१) देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण :- तुझे आहे तुजपाशी, प्रकाशक- सौ.शुभदा विष्णू परचुरे, परचुरे प्रकाशन २०३/४ मेहता भवन ३११, राजाराम मोहन रॉय मार्ग, गिरगाव मुंबई- ४०० ००४, आवृत्ती पहिली, जाने.१९५७, आवृत्ती चौदावी ऑक्टोबर १९९०, पृष्ठ १८.

२) देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण : तुझे आहे तुजपाशी, तत्रैव, पृष्ठ ४७.

३) देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण : तुझे आहे तुजपाशी, तत्रैव, पृष्ठ ७८.

४) देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण : तुझे आहे तुजपाशी, तत्रैव, पृष्ठ ८८.

५) देशपांडे पुरुषोत्तम लक्ष्मण : तुझे आहे तुजपाशी, तत्रैव, पृष्ठ ८९ - ९०.

६) प्रदक्षिणा : खंड दुसरा कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे, ४११ ०३०, प्रथमावृत्ती, १९९१, पुनर्मुद्रण २०१२, पृष्ठ - ५९.

७) मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड सातवा भाग - दुसरा, प्रकाशक - डॉ.माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे- ४११ ०३०, पहिली आवृत्ती, जानेवारी, २०१०.


◆◆◆



ISSN No. 2319-6025

Scanned by CamScanner